पुण्यनगरी ५-५-७

# वसईकरांचा वाहतूक कोंडीने गुदमरतोय 'श्वास'

## उपाययोजना करण्यात पालिकेला अपयश

**वसई :** वसई मोठ्या लोकवस्तीचे शहर आहे. चाकरमानी, सर्वसामान्य प्रवाशांना मात्र स्टेशन परिसरात आल्यावर एकच प्रश्न निर्माण होतो. तो म्हणजे रेल्वे मार्ग, बस मार्ग व बाजारात खरेदी करताना मार्ग काढायचा तरी कसा? कारण या ठिकाणी कोंडीने श्वास गुदमरत असून, योग्य त्या उपाययोजना अद्याप करण्यास महापालिकेला यश आलेले नाही. त्यामुळे नागरिकांतून नाराजीचा सूर उमटत आहे.



नालासोपाऱ्यापाठोपाठ वसईलादेखील वाहतूक कोंडीचा विळखा बसला आहे. एकीकडे रस्ते रुंदीकरण केले जात असले तरी मात्र बेवारस वाहने, फुटपाथवरील फेरीवाले, रस्त्याला लागून असलेली गॅरेज, शोरूममधील उभी राहणारी वाहने त्याचबरोबर सिग्नल जवळदेखील वाहनांची होणारी कोंडी त्यामुळे नागरिकांची यातून मार्ग काढताना दमछाक होत आहे.

वसई पूर्व-पश्चिम ये-जा करण्यासाठी दोन उड्डाणपूल आहेत. मात्र, यातील पूर्वेकडून पश्चिमेला जोडणाऱ्या पुलावरून अवजड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे एकाच पुलावर अधिक भार येतो. वाहनांच्या भल्या मोठ्या रांगादेखील लागत असतात. तसेच वसई पूर्वेला औद्योगिक वसाहत असल्याने सातिवली, वालीव, वसई फाटा, गावराईपाडा यासह आजूबाजूच्या परिसरात असणाऱ्या कारखान्यात जाणाऱ्या हजारो कामगारांना वाहतूक कोंडीला सामोरे जाणे हे नित्याचे झाले आहे. कोट्यवधी खर्च करून जरी रस्ते रुंदीकरण केले असले तरी मात्र वाहतूक व्यवस्था कोलमडलेली आहे. एकीकडे उड्डाणपूल उभारणार अशी घोषणा प्रशासनाने केली असली तरी प्रत्यक्षात कोणतीच कार्यवाही अद्यापही झालेली नाही. त्यामुळे रस्ते मार्गाशिवाय पर्याय उरला नाही. त्यात कोंडीत सर्वसामान्य माणसांसह अत्यावश्यक सेवादेखील कोंडीत सापडली आहे.

# गोखिवरे येथील कचराभूमीवरील सीएनडी वेस्ट प्रकल्पाला युवासेनेचा विरोध

## नागरिकांना श्वसनाचे रोग होण्याची भीती

**वसई :** वसई-विरार महापालिका हद्दीत गोखिवरे येथील क्षेपणभूमीचा प्रश्न दिवसेंदिवस अधिकच गंभीर होत असताना आता महानगरपालिका प्रशासनाकडून बांधकामाच्या निघणाऱ्या राडारोड्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सीएनडी वेस्ट प्रकल्प गोखिवरे भोईदापाडा येथील कचरा भूमीवरच उभारला जात आहे. त्यामुळे यावरून युवासेना आक्रमक झाली असून, युवासेनेचे (उद्धव ठाकरे गट) अतुल काकासाहेब मोटे यांनी या प्रकल्पाला विरोध केला आहे. हा प्रकल्प या ठिकाणी उभारला गेल्यास लाखो नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणार आहे. या नवीन प्रकल्पामुळे हवेतील धुलीकणांची संख्या वाढून ते सूक्ष्मधुलीकण श्वसनाद्वारे सामान्य रहिवाशांच्या संपर्कात येऊन गोखिवरे भोईदापाडा येथे श्वसनाचे आजार बळावतील अशी भीती त्यांनी व्यक्त केली आहे.

### विरोधी पक्ष नेत्यास शिष्टमंडळ भेटणार

या प्रकरणी लवकरच राज्याचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची भेट घेऊन त्यांना यासंदर्भात पत्र देणार असल्याचे मोटे यांनी सांगितले. वसई-विरार महापालिका हद्दीत महापालिकेच्या अनेक भूखंडांवर अतिक्रमण करण्यात आले असून, प्रथम ते भूखंड ताब्यात घेऊन त्या जागेवर हा प्रकल्प उभारावा, अशी संतप्त प्रतिक्रिया अतुल मोटे यांनी दिली आहे. आमचा विकासकामांना विरोध नसून डम्पिंग प्रकल्पामध्ये आज शेकडो समस्या उद्भवत असताना त्या समस्या सोडवण्यासाठी महापालिका कुठल्याही प्रकारच्या उपाययोजना करत नसून त्या उलट असे प्रकल्प आणून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ महापालिका करत आहे.

शहरात महामार्ग, मुख्य रस्ते, नागरी वस्त्या अशा सर्वच ठिकाणी बांधकाम तोडलेला राडारोडा टाकला जात आहे. त्याची विल्हेवाट लावण्यासाठी वसई-विरार शहर महानगरपालिकेने गोखिवरे येथील भोईदापाडा येथील कचरा भूमीवरच हा सीएनडी प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला आहे. शहरात सध्या प्रशासकीय राजवट लागू आहे. लोकप्रतिनिधी मंडळ नसतानादेखील महानगरपालिका आयुक्तांकडून इतका मोठा प्रकल्प कुणाला विश्वासात घेऊन उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे? असा संतप्त सवाल आता नागरिकांकडूनदेखील उपस्थित करण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी वसई-विरार शहर महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची परवानगी घेतली आहे का? याअगोदरच गोखिवरे येथील भोईदापाडा येथे असलेल्या डम्पिंग प्रकल्पामुळे लाखो नागरिक नाहक त्रास सहन करत असताना आता महानगरपालिकेकडून हा प्रकल्प कशाला? असा संताप्त सवाल गावकऱ्यांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

Scanned with CamScanner

लोकसत्ता पा.नं.९५.

# उत्तन परिसरावर 'सीसीटीव्ही'चे नियंत्रण

लोकसत्ता वार्ताहर

**भाईंदर :** उत्तन येथील गुन्हेगारीवर रोख लागावी या हेतूने हा संपूर्ण परिसर सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या नियंत्रणाखाली आणण्यात आला आहे. यासाठी सुमारे १ कोटी रुपये खर्च करण्यात आले असून याचे लोकार्पण शुक्रवारी पार पडले.

भाईंदर पश्चिम येथील उत्तन हा परिसर नैसर्गिक विविधतेने नटलेला आहे. त्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पर्यटकांची गर्दी पाहण्यास मिळते. पोलिसांचे काम सोपे व्हावे आणि हा संपूर्ण परिसर नियंत्रणाखाली राहावा म्हणून आमदार गीताचे यांनी सीसीटीव्ही कॅमेरे उभारण्याची संकल्पना आखली होती. उत्तनच्या प्रमुख चौकांवर, पर्यटनस्थळी, समुद्रकिनारी आणि गावात हे कॅमेरे बसवले. या सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या नियंत्रण कक्षाच्या लोकार्पणाचा कार्यक्रम शुक्रवारी आमदार गीता जैन यांच्या हस्ते पार पडला. या प्रसंगी आयुक्त दिलीप ढोले, अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, पोलीस उपायुक्त जयवंत बजबळे, उपायुक्त रवी पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक दादाराम कारंडे आणि भाजप जिल्हा अध्यक्ष रवी व्यास उपस्थित होते.

# वालीवच्या सहाय्यक आयुक्त धनश्री शिंदे यांची बदली

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** वसई-विरार महापालिकेतील अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे सत्र सुरूच आहे. वसई पूर्वेच्या प्रभाग समिती-जी (वालीव) च्या साहाय्यक आयुक्त धनश्री शिंदे यांची मुख्यालयात बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी दयानंद मानकर यांची प्रभारी साहाय्यक आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

वसई-विरार महापालिकेचे ९ प्रभाग आहेत. मात्र साहाय्यक आयुक्तांची पदे भरली गेली नसल्याने अधीक्षकांना बढती देऊन प्रभारी साहाय्यक आयुक्त बनविण्यात आले होते. परंतु सातत्याने विविध कारणांमुळे या प्रभारी साहाय्यक आयुक्तांच्या बदल्या करण्यात येत आहेत.

मागील आठवड्यात नवघर माणिकपूरचे प्रभारी साहाय्यक आयुक्त गिल्सन घोन्साल्विस यांची बदली करण्यात आली होती. आता पालिकेने वालीव प्रभाग समितीच्या साहाय्यंक आयुकत धनश्री शिंदे यांची अचानक बदली करून मालमत्ता विभागाच्या साहाय्यक आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

याशिवाय त्यांच्याकडे आस्थापना विभागाच्या साहाय्यक आयुक्तपदाचा अतिरिक्त कार्यभार देखील सोपविण्यात आला आहे. वालीव प्रभाग समितीच्या रिक्त झालेल्या जागेवर प्रतीक्षेच्या नियुक्तीत असलेले प्रभारी साहाय्यक आयुक्त दयानंद मानकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# शिजान खानच्या जामीन अर्जावरील सुनावणी सोमवारी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** अभिनेत्री तुनिशा शर्मा आत्महत्येप्रकरणी शुक्रवारी देखील आरोपी शिजान खानला दिलासा मिळाला नाही. याप्रकरणी पुढील सुनावणी सोमवारी होणार असल्याने शिजानचा तुरुंगातील मुक्काम वाढला आहे.

शुक्रवारी शिजान खानच्या जामीन अर्जावरील सुनावणी घेण्यात आली. या खटल्यासाठी तुनिशाच्या वतीने विशेष सरकारी अभियोक्ताची मागणी शासनाकडे करण्यात आली होती. ती मागणी मान्य करून त्यानुसार ॲड. संजय मोरे यांची विशेष अभियोक्ता म्हणून नियुक्ती झाली. परंतु त्यांनी या खटल्यासाठी वेळ मागितल्याने न्यायालयाने पुढील सुनावणीसाठी सोमवार २७ फेब्रुवारी ही तारीख दिली आहे. यामुळे शिजानच्या कुटुंबीयांची निराशा झाली असून त्याला बाहेर येण्यासाठी आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे

Scanned with CamScanner

लोकसत्ता पा. नं. १५

## जुन्या पेन्शन योजनेसाठी सरकारी कर्मचारी-शिक्षक आक्रमक

# १४ मार्चपासून संपाची हाक!

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांतील निवडणुकीत कळीचा मुद्दा ठरलेली जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी सरकारी कर्मचारी आणि शिक्षकांच्या संघटनेने आक्रमक पवित्रा घेतला आहे. जुन्या पेन्शन योजनेसाठी कर्मचारी संघटनांनी १४ मार्चपासून बेमुदत संपाचा इशारा दिला आहे. त्यामुळे शिंदे- फडणवीस सरकारची कसोटी लागणार आहे.

सर्व कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्ती वेतन (पेन्शन) योजना लागू करावी, या प्रमुख मागणीसह इतर प्रलंबित मागण्यांसाठी राज्य सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी १४ मार्चपासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सरकारला संपाची नोटीस देण्यात आली असून, आता ही आरपारची लढाई असेल, असे कर्मचारी समन्वय समितीचे निमंत्रक विश्वास काटकर यांनी सांगितले.

शासकीय सेवेत नोव्हेंबर २००५ पासून रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी राज्य शासनाने जुनी निवृत्ती वेतन योजना रद्द करून नवीन निवृत्ती वेतन योजना (एनपीएस) लागू केली आहे. मात्र, या योजनेस कर्मचाऱ्यांचा विरोध आहे. त्यानुसार जुनीच निवृत्ती वेतन योजना लागू करावी, या मागणीसाठी राज्यातील सर्व शासकीय कर्मचारी-शिक्षक आग्रही आहेत. वारंवार लक्ष वेधूनही शासनाने कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे शासकीय, निमशासकीय, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समिती तसेच राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या बैठकीमध्ये बेमुदत संपाचा निर्णय घेण्यात आल्याचे काटकर यांनी स्पष्ट केले. संपाची नोटीस मंत्रालयात, जिल्हा पातळीवर सर्व जिल्हाधिकाऱ्यांद्वारे शासनास देण्यात आली आहे.

### शिंदे-फडणवीस सरकारची कसोटी

नुकत्याच झालेल्या विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुकीत जुन्या निवृत्त वेतन योजनेचा मुद्दा प्रभावी ठरला होता. भाजपला पाचपैकी फक्त एक जागा मिळाली होती. जुन्या निवृत्ती वेतन योजनेस भाजपने केलेला विरोध आपल्या पराभवास कारणीभूत ठरल्याचे नागपूर शिक्षकमधील भाजपच्या पराभूत उमेदवाराने जाहीरपणे सांगितले होते. हिवाळी अधिवेशनात फडणवीस यांनी जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याची मागणी फेटाळून लावली होती. मात्र, विधान परिषद निवडणुकीत हा मुद्दा विरोधात गेल्याचे निदर्शनास येताच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्यास अनुकूल भूमिका घेतली होती. मात्र, कर्मचाऱ्यांचा वाढता दबाव आणि केंद्राची प्रतिकूल भूमिका यामुळे शिंदे-फडणवीस सरकारची कसोटी लागणार आहे.




### पाच राज्यांमध्ये योजना लागू

आतापर्यंत राजस्थान, छत्तीसगड आणि हिमाचल प्रदेश या तीन काँग्रेसशासित राज्यांसह पंजाब आणि झारखंड अशा पाच राज्यांमध्ये जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेबाबत काँग्रेस आग्रही आहे.

### मोदींची प्रतिकूल भूमिका

राज्यसभेत केलेल्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेजारील पाकिस्तान आणि श्रीलंकेतील आर्थिक आणीबाणीचे उदाहरण देताना राज्यांना आर्थिकदृष्ट्या पिछाडीवर नेणाऱ्या योजनांच्या मागे लागू नका, असा सल्ला दिला होता. त्यातून भावी पिढीचे आपण नुकसान करणार आहोत, अशी टिप्पणी मोदी यांनी केली होती. मोदी यांचा रोख जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करणाऱ्या बिगरभाजपशासित राज्यांवर होता. मोदी यांनी जुनी निवृत्ती योजना फायदेशीर नाही, असे स्पष्ट केले असताना शिंदे-फडणवीस सरकार ही योजना लागू करण्याचा निर्णय घेण्याची शक्यता धूसर आहे.

Scanned with CamScanner

म. टा. पु. पा. १.

# हल्ल्याप्रकरणी एकाला अटक

म. टा. वृत्तसेवा, वसई

विरारमधील आयर्न मॅन हार्दिक पाटील यांच्या घरावरील पेट्रोलबॉम्ब हल्ला प्रकरणात आणखी एकाला अटक करण्यात आली आहे. याआधी सात जणांना अटक करण्यात आली होती.

हार्दिक पाटील यांनी देश-विदेशातील अनेक आयर्न मॅन स्पर्धा यशस्वीपणे पूर्ण केल्या आहेत. त्यांच्या विरार येथील निवासस्थानी मे २०२१मध्ये अज्ञात व्यक्तींनी पेट्रोलबॉम्ब फेकला होता. यात त्यांच्या घराबाहेरील सामानाला आग लागली होती. ही घटना घराबाहेरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली होती. यानंतर हार्दिक यांनी विरार पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. या प्रकरणी पोलिसांनी मागील दीड वर्षांत आठ जणांवर गुन्हा दाखल करत त्यातील सात जणांना अटक केली होती. अटकेतील एकाने दिलेल्या जबाबानुसार, आणखी एकावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. ४५ दिवसांपूर्वी कांचन ठाकूर याचा अटकपूर्व जमीन नामंजूर करण्यात आला होता. त्यानंतर तो फरार होता, मात्र बुधवारी विरार पोलिसांनी त्याला अटक केली असून गुरुवारी त्याला न्यायालयात हजर केले असता, त्याला २८ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आल्याचे विरार पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांनी सांगितले.

या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे सोपवावा, अशी मागणी पाटील यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री तसेच राज्यपालांकडे केली आहे.

# सलूनच्या नावाखाली शरीरविक्रय

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

सलूनच्या नावाखाली पुरुष ग्राहकांकडून पैसे घेत त्या बदल्यात शरीरविक्रय व्यवसायांसाठी तरुणी पुरवल्या जात असल्याची बाब नुकतीच मिरा रोडमध्ये समोर आली आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करत सलून व्यवस्थापक व त्याच्या सहकाऱ्याला अटक करण्यात आली आहे.

मिरा रोडच्या नया नगर येथील 'सॉफ्ट टच स्पा सलून'मध्ये येणाऱ्या पुरुष ग्राहकांकडून मसाजच्या बदल्यात पैसे घेत, त्यांना सलूनमध्ये काम करणाऱ्या तरुणी शरीरविक्रयासाठी पुरवल्या जात असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधित कक्षाला मिळाली होती. त्यानुसार, पोलिसांनी सलूनमध्ये बोगस ग्राहकाला पाठवले असता, त्याने केलेल्या मागणीनुसार सलूनचा व्यवस्थापक तैसिक खान व त्याचा सहकारी एक १७ वर्षीय अल्पवयीन तरुणी शरीरविक्रयासाठी दाखवून त्या बदल्यात पैसे स्वीकारताना आढळले. या प्रकरणी तैसिक व सहकाऱ्याला पोलिसांनी ताब्यात घेत, नया नगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

Scanned with CamScanner

पुढारी पा-नं. ६.

# भाईंदर स्थानकात आरक्षण केंद्रांवर मराठी अर्जाला डच्चू

## मनसेने दिला आंदोलन छेडण्याचा इशारा

भाईंदर : पुढारी वृत्तसेवा

मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा असल्याचे परिपत्रक राज्य शासनाने वारंवार काढून केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने देखील राज्यातील रेल्वेच्या कारभारात मराठी भाषेला प्राधान्य देण्याचे परिपत्रक वेळोवेळी जारी केले आहेत. तरी सुद्धा पश्चिम रेल्वेवरील भाईंदर रेल्वे स्थानकातील आरक्षण केंद्रावर तिकीट आरक्षणासाठी देण्यात येणारा छापील अर्ज इंग्रजी, हिंदी भाषेसह चक्क गुजराती भाषेत दिला जात असल्याचे मनसेच्या निदर्शनास आले. मनसेचे शहर अध्यक्ष हेमंत सावंत यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने पश्चिम रेल्वे प्रशासनाला तात्काळ निवेदन देत आरक्षण अर्ज इंग्रजी, हिंदीसोबतच मराठी भाषेतच असावा, अशी मागणी केली आहे. तसे न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सावंत यांनी दिला आहे.

> पश्चिम रेल्वे प्रशासनाने भायंदर चे भाईंदर, बांद्रा चे वांद्रे केले, तिकिटावर मराठी भाषेचा वापर करण्यास सुरुवातर केली. असे असताना तिकीट आरक्षण अर्जात मात्र परराज्यातील भाषेचा वापर करून भाषिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न पश्चिम रेल्वेने सुरु केला आहे. अर्ज मराठी भाषेतच असावा, अशी मागणी रेल्वे प्रशासनाकडे केली असून तसे न झाल्यास मनसे तीव्र आंदोलन छेडणार आहे.
>
> **- हेमंत सावंत,** मनसे मिरा-भाईंदर शहर अध्यक्ष

केंद्र शासनाच्या त्रिभाषा सूत्रानुसार महाराष्ट्र राज्यातील केंद्र शासनाच्या सर्व कार्यालयांमध्ये इंग्रजी, हिंदी भाषेसोबतच मराठी भाषेचा वापर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या राजभाषा विभागाकडून १८ जून १९७७ व १ जुलै २०१० रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये तसेच ५ डिसेंबर २०१७ व ६ नोव्हेंबर २०२० रोजीच्या शासन परिपत्रकान्वये प्रादेशिक भाषेचा वापर करण्याचे निर्देश राज्यातील सर्व रेल्वे कार्यालयांना देण्यात आले आहेत. त्याला छेद देत भाईंदर रेल्वेस्थानकावरील आरक्षण केंद्राद्वारे तिकीट आरक्षणाचा छापील अर्ज मराठी भाषेऐवजी गुजराती भाषेत प्रवाशांना भरण्यासाठी दिला जात आहे. ही बाब मनसेच्या निदर्शनास येताच शहर अध्यक्ष हेमंत सावंत यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने पश्चिम रेल्वे प्रशासनाला निवेदन देत महाराष्ट्र राज्यातील रेल्वेचा कारभार मराठी या प्रादेशिक भाषेतच व्हावा, राज्यात मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा असल्याने तिला डावलून तीचा अपमान करू नये, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

सामना पा-नं.२०

### मीरा-भाईंदरमधील वाहतूक विभागाचा उफराटा कारभार

# रुग्णालयात आलेल्या वाहनांवर कारवाई; हॉटेल्स, मॉल्ससमोरील पार्किंगवर मेहरबान

भाईंदर, दि. २४ (सा.वा.) - मीरा-भाईंदर वाहतूक विभागाचा उफराटा कारभार चव्हाट्यावर आला आहे. रहदारीस अडथळा ठरणाऱ्या हॉटेल्स, मॉल्स, बिग बाजार, डी मार्ट, स्टार बाजार व अन्य व्यावसायिक आस्थापना बाहेर असलेल्या बेकायदा वाहन पार्किंगवर पोलीस मेहरबान आहेत. याउलट रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्यांच्या गाड्या उचलून नेण्यात पोलीस तत्परता दाखवत असल्याने संताप व्यक्त होत आहे.



शहरात बेकायदा पार्किंगला वाहतूक विभागाने अभय दिलेला आहे, भाईंदर पूर्व, पश्चिम जोडणाऱ्या उड्डाण पुलावरच वाहतूक पोलिसांच्या आशीर्वादाने रिक्षा स्टॅण्ड बनवला आहे. तेथूनच प्रवासी वाहतूक केली जाते. शहरातील बेकायदा पार्किंगमुळे वाहतूककोंडीतदेखील भर पडली आहे. मात्र महापालिका प्रशासन व वाहतूक विभाग या समस्येकडे कानाडोळा करत आहे. शहरातील रस्त्यांवर पार्किंगची नियोजनाची व्यवस्था महापालिकेकडून झाली नसल्याने वाहनचालक जागा मिळेल तिथे वाहने पार्क करतात. त्यामुळे शहरात वाहतूककोंडीची समस्या निर्माण होते. या समस्येकडे प्रशासन कानाडोळा करत आहे. त्यामुळे वाहनचालक जिथे जागा मिळेल तिथे वाहने उभी करत आहेत.

मीरा-भाईंदर शहरात मॉल, हॉटेल, बिग बाजार व मोठे मोठे हॉटेल रेस्टॉरंट, बार याठिकाणी उभ्या असलेल्या वाहनांवर वाहतूक विभाग पैसे घेऊन कारवाई करत नाही. मात्र रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांच्या गाड्या उचलून नेल्या जात आहेत. बेकायदा पार्किंग व शांती शॉपिंग सेंटर येथे विनापरवानगी पार्किंगकडे मात्र पोलीस दुर्लक्ष करत असल्याने वाहनधारक संताप व्यक्त करत आहेत.

Scanned with CamScanner

लोकमत

# अमली पदार्थ पिणारे अटकेत

नालासोपारा : पेल्हार पोलिसांनी गुरुवारी संध्याकाळी गावरापाडा आणि पांडेनगर परिसरात अमली पदार्थ पिणाऱ्या तीन आरोपींना पकडले आहे. मोहम्मद शाहरुख शेख (वय २६), सुनील यादव (२०) आणि अजय कश्यप (३५) अशी पकडलेल्या तीन आरोपींची नावे आहेत. पेल्हार पोलिसांनी वेगवेगळे तीन गुन्हे दाखल केले आहेत. पेल्हार पोलिस अधिक तपास करीत आहेत.

Hello Vasai
Page No. 4 Feb 25, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

# वसईत तडीपार गुंडाला अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : वसईत दोन वर्षांपूर्वी तडीपार केल्यानंतरही शहरात खुलेआम फिरणाऱ्या गुंडाला अटक करण्यात आली आहे. पाचूबंदर स्मशानभूमी, वसई पश्चिम येथील आरोपी हैदर अन्वर शेख (२६) याला मीरा-भाईंदर वसई-विरार पोलिस उपायुक्त, परिमंडळ-२ कडून २३ डिसेंबर २०२२ पासून पालघर, ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर कार्यक्षेत्रातून दोन वर्षांसाठी तडीपार आदेश देण्यात आला होता.

Mumbai Main
Page No. 8 Feb 25, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्षः 26 अंक-252 मुंबई, शनिवार 25 फरवरी 2023 पृष्ठ-12 मूल्य :2.00

# पुलिस बलों में महिला पुलिसकर्मियों की होगी बढोत्तरी ?

**वसई :** केंद्रीय गृह मंत्रालय ने सुझाव दिया है कि राज्यों को अपने पुलिस बलों में महिला पुलिस का प्रतिशत बढ़ाकर 33 प्रतिशत करना चाहिए। विभाग ने यह भी कहा कि पुलिस बल में कुछ रिक्त पदों को महिला पुलिस कांस्टेबल और सब-इंस्पेक्टर के पदों में परिवर्तित किया जाना चाहिए।

पुलिस बल में महिला पुलिसकर्मियों की भर्ती करना और उनकी संख्या बढ़ाना राज्यों की जिम्मेदारी है। पुलिस बल में पुरुष और महिला पुलिस की संख्या में संतुलन बनाए रखने के लिए राज्यों को काम करना होगा। केंद्र सरकार देश में महिला पुलिस की संख्या बढ़ाने के लिए गंभीरता से काम कर रही है। केंद्र ने बार-बार राज्यों को पुलिस बल की संख्या




बढ़ाकर 33 प्रतिशत करने का निर्देश दिया है। वर्तमान में राज्य में महिला पुलिस का अनुपात केवल 11.75 प्रतिशत है। प्रत्येक पुलिस स्टेशन में कम से कम 13 महिला पुलिसकर्मियों को रखने का फार्मूला तय किया गया है। प्रत्येक थाने में तीन महिला उप निरीक्षक व 10 महिला सिपाही की नियुक्ति की जाए।

इसलिए महिला हेल्प डेस्क 24 घंटे काम कर सकेगी, मीरा भायंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय में वर्तमान में 267 महिला पुलिस अधिकारी हैं जिनमें 243 महिला कर्मचारी और 24 महिला अधिकारी शामिल हैं, इन महिला पुलिस कर्मचारी व अधिकारियों की निगाहें अपराधियों पर पैनी नजर रहती है। पिछले कुछ महीनों में चर्चित टीवी एक्ट्रेस तुनिषा शर्मा आत्महत्या मामले में वालीव पुलिस स्टेशन की जांच अधिकारी पुलिस सब-इंस्पेक्टर लक्ष्मी बोरकर ने गुरुवार को वसई कोर्ट में आरोपी शिजान खान के खिलाफ 524 पन्नों की चार्जशीट दायर की है। इसमें उल्लेख किया गया है कि उसने शिजान खान से मिलने के बाद आत्महत्या कर ली और उसे अपनी आत्महत्या का दोषी ठहराया।

## र्ज करने का आदेश



दौरान उपायुक्त मुठे ने अतिक्रमण की कार्यवाही में बाधा डालने की कोशिश करने पर वार्ड अधिकारियों को अवैध गाला धारक रहमान और उनके बेटे के खिलाफ मामला दर्ज करने का आदेश दिया है। ज्ञात हो कि इसके पहले विविसीएमसी ने प्रभाग 'जी' में 3 से 4 दिन तक लगातार अवैध निर्माणों पर तोडू कार्रवाई की गई थी, जिसमें लाखों वर्ग फुट में अवैध निर्माण तोड़े गए थे।

Scanned with CamScanner

पुढारी

# स्पाच्या नावाखाली वेश्याव्यवसायावर कारवाई

मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा

नयानगर पोलीस ठाणे हद्दीत स्पा सेंटरमध्ये मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय करणाऱ्या वर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने कारवाई केली आहे. कारवाई करून दोन पीडित मुलींची सुटका केली आहे.

नयानगर पोलीस ठाणे हद्दीतील शांती नगर सेक्टर ५, भारत गॅस गोडाऊन, शांती प्लाझा समोरील एका इमारतीमध्ये सॉफ्ट टच स्पा सेंटरमधील मसाज सेंटरचा नोकर मसाजच्या नावाखाली अल्पवयीन मुलीला वेश्याव्यवसाय करायला लावत असल्याची अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार पथकाने कसून चौकशी करून सॉफ्ट टच स्पा सेंटरमध्ये सापळा रचून मसाज सेंटरवर छापा टाकला. त्यावेळी मसाज सेंटरचा मॅनेजर आणि नोकराला ताब्यात घेतले. १७ वर्षाची अल्पवयीन मुलगी आणि २४ वर्षांची पीडित मुलगी यांची वेश्याव्यवसायाच्या दलदलीतून सुटका केली. चौकशी केली असता मसाज सेंटरचे मालक, व्यवस्थापक आणि नोकर हे मसाजच्या नावावर अनेक महिन्यांपासून वेश्याव्यवसाय चालवत होते.

## पोलिसांचे आवाहन

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत गैरधंद्यांवर कारवाई करण्यासाठी पोलीस आयुक्तांनी सूचना दिल्या आहेत. त्यानुसार सर्व पोलीस ठाण्यांच्या पथकाने कारवाईसाठी विशेष मोहीम सुरू केली आहे. आपल्या आजूबाजूला कुठल्याही प्रकारे गैरकृत्य होत असल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क साधा, असे आवाहन पोलीस आयुक्त मधुकर पाण्डये यांनी नागरिकांना केले आहे.

My Thane Edition
Feb 24, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

Scanned with CamScanner

# मसाज पार्लर पर छापा, दो लड़कियां कराई गई मुक्त



**भायंदर:** मीरा भायंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय की अनैतिक मानवी प्रतिबंध वाहतुक शाखा ने मीरारोड में एक मसाज पार्लर की आड़ में चल रहे वैश्या व्यवसाय के गोरखधंधे पर छापा मारकर दो लड़कियों को मुक्त करवा कर तीन लोगो को हिरासत में लिया है।

प्राप्त जानकारी के अनुसार अनैतिक मानवी प्रतिबंध वाहतुक शाखा भायंदर के पुलिस निरीक्षक समीर अहिराव को यह गुप्त जानकारी मिली की मीरारोड नयानगर के एक गाले में हीना कुरेशी तथा तोसीफ खान पुरुष ग्राहकों से पैसे वसूल कर लड़किया उपलब्ध करवाते है जिस पर पुलिस ने मसाज स्पा सेलून में नकली ग्राहक भेजा तथा पैसा नक्की कर लड़की की मांग की जिस पर एक नाबालिग तथा एक 28 वर्षीय लड़की बताई गई।

पुलिस को जब इस गोरखधंधे की पक्की पुर्तता हुई तो वहा पर छापा मारकर तोसिफ खान सेलून में सफाई काम करने वाले गोपाल माली तथा हीना कुरेशी को हिरासत में लेकर दो लड़कियों को मुक्त करवा कर आरोपियों के खिलाफ भारतीय दण्ड संहिता की धारा 366A, 370 A, 370, (3,) तथा 34 के तहत मामला दर्ज किया गया है।

यह कार्यवाही पुलिस उपायुक्त अपराध अविनाश अंबुरे, सहायक पुलिस उपायुक्त अमोल मांडवे के मार्गदर्शन में अनैतिक मानवी प्रतिबंध वाहतुक कक्ष भायंदर के पुलिस निरीक्षक समीर अहिराव तथा पुलिस कर्मियों द्वारा की गई।

## मध्य रेल पर दिनांक 26.2.2023 को मेगा ब्लॉक

**मुंबई :** मध्य रेल, मुंबई मंडल दिनांक 26.2.2023 को विभिन्न इंजीनियरिंग और रखरखाव कार्यों को करने के लिए अपने उपनगरीय खंडों पर मेगा ब्लॉक संचालित करेगा। माटुंगा-मुलुंड अप और डाउन स्लो लाइन सुबह 11.00 बजे से दोपहर 3.55 बजे तक सुबह 10.14 बजे से दोपहर 3.18 बजे तक छत्रपति शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई से छूटने

शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई से पनवेल/बेलापुर के लिए छूटने वाली डाउन हार्बर लाइन सेवाएं रद्द रहेंगी। सुबह 11.02 बजे से दोपहर 3.53 बजे तक पनवेल से ठाणे के लिए छूटने वाली अप ट्रांसहार्बर लाइन की सेवाएं और सुबह 10.01 बजे से दोपहर 3.20 बजे तक ठाणे से पनवेल के लिए छूटने वाली डाउन ट्रांसहार्बर लाइन की सेवाएं रद्द रहेंगी।

Scanned with CamScanner